# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** 1) नागपूर महानगरपालिका ठराव क्र.241/वि.क्र.112,दि.02.03.2022

**{समाज विकास विभाग}** समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत दिव्यांग बांधवांकरिता वैयक्तिक तथा सामुहिक योजने अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवितांना त्यांच्या अटी व शर्ती निर्गमित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संबंधित सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

सन 2023-2024 या आर्थिक वर्षात नागपूर मनपा द्वारे दिव्यागांच्या सुरु असलेल्या योजनाबाबत मा.प्रशाक तथा आयुक्त यांना बैठक दि.08.09.2023 रोजी आयोजित करून दिव्यांग विकास आराखड्यास मान्यता प्रदान केली.आराखड्यातील अनु क्र.5 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांगांना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजनेच्या विहित निकषामध्ये खालील प्रमाणे नमूद सुधारणा करून सुधारित निकषानुसार योजना राबविण्याची बाब विचारात घेणे.

योजना :- दिव्यांगाना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना.

अर्थसहाय्य :- या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्याकरिता रु.60,000/- पर्यंत अनुदानाची कमाल मर्यादा निश्चित आहे.

**योजनेचा उद्देश :-**

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वावर मात करून त्यांचे आयुष्य स्वावलंबी बनविण्याकरिता चलनवलन साहित्यांची नितांत आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे साधनांचा समावेश आहे. परंतु उत्तम दर्जाचे चलनवलन साहित्य व सहाय्यक उपकरणे आर्थिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना परवडत नाहीत. याकरिता खाली नमूद साहित्य खरेदी करण्याकरिता आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात यावे. या बाबींचा विचार करता दिव्यांगांकरिता सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

१. अंध व्यक्तींसाठी संगणक (जॉस सॉफ्टवेअर), ब्रेल नोट वेअर, Communication Equipment Braille attachment Telephone, Adapted Walkers, ब्रेल लेख साहित्य, ब्रेल टाईपरायटर टॉकिंग टाईपरायटर, लार्ज प्रिंट बुक, अल्पदृष्टी अपंगत्वावर मात करणेसाठी Digital Magnifiers Smart Cane इत्यादी.
२. कर्णबधिर व्यक्तींसाठी विविध प्रकारची वैयक्तिक श्रवणयंत्रे (बीटीईसह), शैक्षणिक संच, संवेदन उपकरणे, संगणकासाठीचे सहाय्यभूत उपकरणे.
३. अस्थिव्यंग व्यक्तींसाठी Adopted Scutoor, कॅलीपर्स, व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, स्वयंचलित तीन चाकी सायकल, कुबड्या, कृत्रिम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड नील वॉकी ब्रेस, डिव्हायसेस फॉर डेली लिव्हिंग.
४. मतिमंद व्यक्तींसाठी मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य (MR Kits), बुद्धिमत्ता चाचणी संच, सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधने.
५. बहुविकलांग व्यक्तींसाठी संबधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे, सी.पी.चेअर, स्वयंचलित सायकल व खुर्ची, संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.
६. कुष्ठरोग मुक्त दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व साधने, सर्जिकल ॲण्ड करेक्टीव्ह फुटवेअर्स, सर्जिकल अप्लायंसेस, मोबिलिटी एड इत्यादी.

**लाभार्थ्यांचे अटी व शर्ती :-**

१. कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
२. आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.
३. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
४. अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील.

५. अर्जदार/ दिव्यांगाचे पालकांनी चलनवलन साहित्याच्या आवश्यकतेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
६. लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. १००/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.
७. सदरची योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयातीत एकदाच लाभ मिळेल.
८. विद्यार्थी उपयोगी साधने जसे,संगणक,लॅपटॉप,शैक्षणिक संच,संगणकाचे सहायभूत साधने इत्यादी मागणी करणाऱ्या अर्जदाराचे वय 15 ते 35 वर्ष पर्यंत असणे बंधनकारक राहील.35 वर्ष पेक्षा अधिक वय असणाऱ्या अर्जदारास या उपकरणाचा लाभ मिळणार नाही.
९. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावेत.
१०. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार अटी व शर्तीच्या अधिन राहून दिव्यांगाना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना DBT तत्वावर राबविण्याकरिता प्रस्तावास मान्यता प्रदान करणे.
टिप - योजनेंतर्गत खर्च दिव्यागांकरिता मदत या पदशीर्ष क्र. A27301342302 मधून करण्यात येईल

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 698/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 11/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार 1) नागपूर महानगरपालिका ठराव क्र.241/वि.क्र.112,दि.02.03.2022

समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत दिव्यांग बांधवांकरिता वैयक्तिक तथा सामुहिक योजने अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवितांना त्यांच्या अटी व शर्ती निर्गमित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संबंधित सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

सन 2023-2024 या आर्थिक वर्षात नागपूर मनपा द्वारे दिव्यागांच्या सुरु असलेल्या योजनाबाबत मा.प्रशाक तथा आयुक्त यांना बैठक दि.08.09.2023 रोजी आयोजित करून दिव्यांग विकास आराखड्यास मान्यता प्रदान केली.आराखड्यातील अनु क्र.5 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांगांना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजनेच्या विहित निकषामध्ये खालीलप्रमाणे नमूद सुधारणा करून सुधारित निकषानुसार योजना राबविण्याची बाब विचारात घेणे.

योजना :- दिव्यांगाना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना.
अर्थसहाय्य :- या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्याकरिता रु.60,000/- पर्यंत अनुदानाची कमाल मर्यादा निश्चित आहे.

**योजनेचा उद्देश :-**

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वावर मात करून त्यांचे आयुष्य स्वावलंबी बनविण्याकरिता चलनवलन साहित्यांची नितांत आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे साधनांचा समावेश आहे. परंतु उत्तम दर्जाचे चलनवलन साहित्य व सहाय्यक उपकरणे आर्थिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना परवडत नाहीत. याकरिता खाली नमूद साहित्य खरेदी करण्याकरिता आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात यावे. या बाबींचा विचार करता दिव्यांगांकरिता सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

१. अंध व्यक्तींसाठी संगणक (जॉस सॉफ्टवेअर), ब्रेल नोट वेअर, Communication Equipment Braille attachment Telephone, Adapted Walkers, ब्रेल लेख साहित्य, ब्रेल टाईपरायटर टॉकिंग टाईपरायटर, लार्ज प्रिंट बुक, अल्पदृष्टी अपंगत्वावर मात करणेसाठी Digital Magnifiers Smart Cane इत्यादी.
२. कर्णबधिर व्यक्तींसाठी विविध प्रकारची वैयक्तिक श्रवणयंत्रे (बीटीईसह), शैक्षणिक संच, संवेदन उपकरणे, संगणकासाठीचे सहाय्यभूत उपकरणे.
३. अस्थिव्यंग व्यक्तींसाठी Adopted Scutoor, कॅलीपर्स, व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, स्वयंचलित तीन चाकी सायकल, कुबड्या, कृत्रिम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड नील वॉकी ब्रेस, डिव्हायसेस फॉर डेली लिव्हिंग.
४. मतिमंद व्यक्तींसाठी मतिमंदासाठी शैक्षणिक साहित्य (MR Kits), बुद्धिमत्ता चाचणी संच, सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधने.
५. बहुविकलांग व्यक्तींसाठी संबधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे, सी.पी.चेअर, स्वयंचलित सायकल व खुर्ची, संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.
६. कुष्ठरोग मुक्त दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व साधने, सर्जिकल ॲण्ड करेक्टीव्ह फुटवेअर्स, सर्जिकल अप्लायंसेस, मोबिलिटी एड इत्यादी.

**लाभार्थ्यांचे अटी व शर्ती :-**

१. कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
२. आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.
३. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
४. अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील.
५. अर्जदार/ दिव्यांगाचे पालकांनी चलनवलन साहित्याच्या आवश्यकतेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
६. लाभ घेणाऱ्या अर्जदाराने इतर शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेत नसल्याचे तसेच केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या व नागपूर महानगरपालिकेच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत नसल्याचे हमीपत्र रु. १००/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.
७. सदरची योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयातीत एकदाच लाभ मिळेल.
८. विद्यार्थी उपयोगी साधने जसे,संगणक,लॅपटॉप,शैक्षणिक संच,संगणकाचे सहायभूत साधने इत्यादी मागणी करणाऱ्या अर्जदाराचे वय 15 ते 35 वर्ष पर्यंत असणे बंधनकारक राहील.35 वर्ष पेक्षा अधिक वय असणाऱ्या अर्जदारास या उपकरणाचा लाभ मिळणार नाही.
९. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावेत.
१०. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार अटी व शर्तीच्या अधिन राहून दिव्यांगाना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना DBT तत्वावर राबविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.